२०/०६/२०२३

प्रति,

मा. प्राचार्य सो

विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, काळे

ता - पन्हाळा

विषय :- २१ June २३ आंतरराष्ट्रीय योगा दिन
घेणेस परवानगी मिळणे बाबत.....

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपल्या महाविद्या-
-लयामध्ये २१ June International Yoga Day
शासनाने दिलेल्या नियमानुसार आपल्या महाविद्यालयाच्या
क्रीडांगणावर घेणेस परवानगी मिळावी ~~बाबत~~ —
हि विनंती

कळावे

VITTHALRAO PATIL MAHAVIDYALAY, KALE
VPM
Arts Commerce & Science

granted

Prof. Vikram Yamagekar
Director of Physical Education
Vitthalrao Patil Mahavidyalay
(Arts. Commerce & Science)
Kale, Tal. Panhala, Dist. Kolhapur

Scanned by CamScanner

# विठ्ठलराव पाटील महाविद्यालय,कळे

## ता.पन्हाळा,जिल्हा.कोल्हापूर

**21 जून 2023**

***शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग***

**** आंतरराष्ट्रीय योग दिन ****

****अहवाल****

**निरोगी तन आणि शांत मनाची**

**गुरुकिल्ली म्हणजे 'योग'.' प्रा.विक्रम यमगेकर**

कळे येथील श्री दत्त शिक्षण प्रसारक मंडळ पणूत्रे संचालित विठ्ठलराव पाटील महाविद्यालय महाविद्यालय कळे या विभागाच्या वतीने संस्थेच्या प्रांगणामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहाने आणि प्रोत्साहित वातावरणामध्ये संपन्न झाला. या योगदिन शिबिराचे उदघाटन प्राचार्या डॉ कमलाकर राक्षसे यांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक विठ्ठलराव पाटील हे होते. कार्यक्रमासाठी प्रशिक्षक व मार्गदर्शक म्हणून प्राध्यापक विक्रम यमगेकर, पतंजलीचे प्रसारक भरत मोळे सहाय्यक शिक्षक विलास पाटील संभाजी बोंद्रे यांनी काम पाहिले.

शासनाने निर्गमित केलेल्या परिपत्रकाप्रमाणे उभी आसने बैठी आसने पोटावरील आसने पाठीवरील आसने कपालभाती प्राणायाम ध्यान या प्रकारे योगाची आसने घेण्यात आली.

अध्यक्षीय भाषणात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विठ्ठलराव पाटील यांनी आपल्या भाषणामध्ये योगाविषयी माहिती सांगितली आपला आजार पळविण्यासाठी

शरीर निरोगी बनविण्यासाठी

शरीराची उर्जा वाढविण्यासाठी

जीवन आनंदी बनविण्यासाठी

आरोग्य ही सर्वात मोठी भेट आहे. आणि हे निरोगी ठेवण्याचे कार्य हे केवळ योगाद्वारेच होते.असे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले.या कार्यक्रमाचे नियोजन क्रीडा विभागाच्या वतीने कारण्यात आले तर सूत्रसंचालन डॉ.पात्रे के.वी यांनी केले तर आभार डॉ.सेलूकार एस.एम. यांनी केले.

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya (Arts, Commerce & Science) Kale
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Prof. Vikram Yamagekar
Director of Physical Education
Vitthalrao Patil Mahavidyalay
(Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Scanned by CamScanner

Shri. Datta Shikshan Prasarak Mandal, Panutre

# Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale

Tal. Panhala Dist. Kolhapur

## International Yoga Day

## 21 June 2023





Prof. Vikram Yamagekar
Director of Physical Education
Vitthalrao Patil Mahavidyalay
(Arts. Commerce & Science)
Kale, Tal. Panhala, Dist. Kolhapur

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, (Arts, Commerce & Science) K
Tal. Panhala, Dist. Kolhapur


Scanned by CamScanner


**International Yoga Day**

**21 June 2023**









**Prof. Vikram Yamagekar**
Director of Physical Education
Vitthalrao Patil Mahavidyalay
(Arts. Commerce & Science)
Kale, Tal. Panhala, Dist. Kolhapur

**I/C PRINCIPAL**
Vitthalrao Patil Mahavidyalaya (Arts, Commerce & Science) Kale
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Scanned by CamScanner

**International Yoga Day**

**21 June 2023**



Prof. Vikram Yamagekar
Director of Physical Education
Vitthalrao Patil Mahavidyalay
(Arts. Commerce & Science)
Kale, Tal. Panhala, Dist. Kolhapur

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalay, (Arts, Commerce & Science) Kale
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Scanned by CamScanner

**International Yoga Day**

**21 June 2023**



VITTHALRAO PATIL MAHAVIDYALAY, KALE
VPM

Prof. Vikram Yamagekar
Director of Physical Education
Vitthalrao Patil Mahavidyalay
(Arts. Commerce & Science)
Kale, Tal. Panhala, Dist. Kolhapur

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, (Arts, Commerce & Science) K-
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Scanned by CamScanner

**International Yoga Day**

**21 June 2023**



Prof. Vikram Vamagekar
Director of Physical Education
Vitthalrao Patil Mahavidyalay
(Arts. Commerce & Science)
Kale, Tal. Panhala, Dist. Kolhapur

I/C PRINCIPAL
Vitthalrao Patil Mahavidyalaya, (Arts, Commerce & Science)
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Scanned by CamScanner

VITTHALRAO PATIL MAHAVIDYALAY, KALE
VPM
Arts, Commerce & Science

**International Yoga Day**

**21 June 2023**



**Prof. Vikram Yamagekar**
Director of Physical Education
Vitthalrao Patil Mahavidyalay
(Arts. Commerce & Science)
Kale, Tal. Panhala, Dist. Kolhapur

**I/C PRINCIPAL**
Vitthalrao Patil Mahavidyalaya, (Arts, Commerce & Science) K
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Scanned by CamScanner

# आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

## शाळा, महाविद्यालयांमध्ये शिक्षकांसह विद्यार्थ्यांनी सादर केली योगाची प्रात्यक्षिके

**करवीर, शाहूवाडी, पन्हाळा, गगनबावडा तालुक्यांत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळा, महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून सांगितले.**

### कळे, पुनाळ परिसर

**कळे :** पन्हाळा तालुक्यातील कळे, पुनाळ परिसरासह धामणी खोऱ्यामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

आ. शंकर धोंडी पाटील विद्यालय कळे येथील आमदार शंकर धोंडी पाटील प्राथमिक विद्यालयामध्ये संस्थेच्या प्रांगणात योग दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्थापक विठ्ठलराव पाटील होते. यावेळी प्रा. विक्रम यमगेकर व पतंजलीचे प्रसारक भरत मोळे यांनी योगासनाची आसने, प्राणायाम, ध्यान प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी मुख्याध्यापक एन. ए. नांदवडेकर, रमेश दराडे, प्रज्ञा निकम आदी उपस्थित होते.

विठ्ठलराव पाटील महाविद्यालय कळे येथील विठ्ठलराव पाटील महाविद्यालयामध्ये योग दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्थापक विठ्ठलराव पाटील होते. यावेळी प्रा. विक्रम यमगेकर व पतंजलीचे प्रसारक भरत मोळे यांनी योगासनांची प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी प्राचार्य डॉ. कमलाकर राक्षसे यांच्यासह सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

शंकरराव चव्हाण विद्यामंदिर शंकरराव चव्हाण विद्यामंदिर पुनाळ येथे योग दिन साजरा करण्यात आला. सूर्यनमस्कार आणि योगासनांचे प्रात्यक्षिक अध्यापक विशाल हारगुले यांनी करून दाखवले. मनोज रानभरे यांनी प्रास्ताविक केले. योगशिक्षिका धनश्री शिंदे यांनी योगासनांचे महत्त्व व फायदे सांगितले. यावेळी दीपाली पाटील, बाबुराव कामत, संजय कुंभार, कुंजन सातपुते, लीलाधर अमरापुरकर आदी उपस्थित होते. पल्लवी रानभरे यांनी आभार मानले.

रामचंद्र पवार हायस्कूल परखंदळे येथील श्री. रामचंद्र पवार हायस्कूलमध्ये योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी भरत मोळे यांनी योगासनांचे प्रात्यक्षिके करून दाखवले. यावेळी त्यांनी प्रात्यक्षिका बरोबर योगाचे फायदे, शारीरिक महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले यावेळी संस्थेचे सचिव एस. टी. सागावकर, प्रभारी मुख्याध्यापक बी. आर. चौगले आदी उपस्थित होते.

### बाजारभोगाव परिसर

**पाटपन्हाळा :** बाजारभोगाव परिसरातील शाळा, महाविद्यालयांमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. यावेळी तज्ज्ञ मार्गदर्शक प्रशिक्षकांनी योगाचे महत्त्व पटवून दिले. तणावमुक्त जीवन जगण्यासाठी नियमित योगासने करावी. ध्यान, धारणेला प्राधान्यक्रम द्यावा, असा सल्ला योगशिक्षकांकडून या कार्यक्रमात आवर्जून देण्यात आला. मुलांनी उत्स्फूर्तपणे योगा करून सर्व योगासनांचा आनंद घेतला.



**हणमंतवाडी हायस्कूल येथे योगासनाची प्रात्यक्षिके करताना विद्यार्थी.**

### योगाची प्रात्यक्षिके

**विशाळगड :** विशाळगड परिसरातील आदर्श माध्यमिक विद्यालय, गजापूर, प्राथमिक व माध्यमिक शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांकडून विविध योगासनांची प्रात्यक्षिके करून विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून देण्यात आले.

माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक एच. एस. पाटील यांनी विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना योगाचे महत्त्व सांगितले. विद्यालय प्रशालेच्या क्रीडांगणावर सर्व विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्राणायाम, सूर्यनमस्कार, विविध आसने केली. यामध्ये एस. टी. पाटील, के. ए. पाटील, टी. टी. सुतार, सचिन चव्हाण, श्रीकृष्ण कांबळे आदींसह गजापूर हायस्कूलचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### करवीर तालुक्यात योगदिन साजरा

**कसबा बीड :** करवीर तालुक्यातील शाळांमध्ये आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात आला. कसबा बीड, महे, कोगे, बहिरेश्वर, म्हारूळ, पाडळी खुर्द, सावरवाडी, गणेशवाडी, हणमंतवाडी आदी ठिकाणी शाळा-कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना योगासनांचे महत्त्व सांगून विविध प्रात्यक्षिके करून घेण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

### योगामुळे जीवनात नवीन ऊर्जा : पाटील

**धुंदवडे :** योग हा भारताचा सांस्कृतिक वारसा आहे. योगामुळे रोगमुक्त आणि शिस्तबद्ध जीवन जगणे सुलभ झाले आहे. मानसिक आणि शारीरिक विकाराचे निराकारण करण्याचा हा सोपा मार्ग आहे. लाखो निराश हताश रुग्णांच्या जीवनात नवीन ऊर्जा, उमेद योगामुळे येते. योगाने लाखो लोकांचे जीवन निरोगी केले आहे. आगामी काळ हा योगाचा आहे, असे प्रतिपादन माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज शेळोशीचे योगशिक्षक आर. बी. पाटील यांनी केले. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते.

धामणी खोऱ्यातील शाळा-महाविद्यालयांमध्ये योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. विविध शारीरिक व्यायाम, कपालभाती, अनुलोम - विलोम, प्राणायाम, ताडासन, वृक्षासन यांसारख्या आसनांचे प्रात्यक्षिक दाखवून त्यांचे महत्त्व विशद केले.

### योगासंदर्भात मार्गदर्शन

**मलकापूर :** शाहूवाडी तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक शाळा-महाविद्यालये, शासकीय कार्यालयात जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. योग शिक्षकाकडून मार्गदर्शन करण्यात आले. न्याय व विधी विभाग शाहूवाडी, पतंजली विभाग शाहूवाडी, व राजर्षी शाहू अ‍ॅकॅडमी यांच्या वतीने शाहूवाडी तहसील प्रभारी संभाजी लोहार व पतंजली महामंत्री पूजा धावडे, डॉ. क्षितिजा धावडे, प्रा. शिवाप्पा पाटील यांनी तर राजर्षी शाहू अ‍ॅकॅडमीचे संजय लोकरे, प्रदीप यादव, अनिल अत्तरकर यांनी योगाची प्रात्यक्षिके करून घेतली.

तहसील कार्यालय, पंचायत समिती, नगरपालिका, विविध शासकीय कार्यालये, प्राथमिक, माध्यमिक शाळा-महाविद्यालये येथे अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी सहभागी झाले होते. मलकापूर नगरपालिका, तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक शाळा-महाविद्यालये व ग्रामपंचायती परिसरात योगासने, सूर्य नमस्कार आदी प्रात्यक्षिके बरोबर योगासने घेण्यात आली. दरम्यान, योग दिनाचे औचित्य साधून गर्ल्स हायस्कूल मलकापूरच्या विद्यार्थिनींनी मलकापूर शहरातील योग दिनाची जनजागृती करण्यासाठी फेरी काढली. तर सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.

### योगामुळे तंदुरुस्ती : पाटील

**कोतोली :** शरीर आपल्यासाठी चोवीस तास काम करत असते. आपण त्यासाठी प्राणायाम, योगा व चालण्यासारखा व्यायाम केल्यास आपल्या शरीरात प्रतिकार शक्ती वाढते. आपण तंदुरुस्त राहतो, असे प्रतिपादन ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव शिवाजीराव पाटील यांनी केले. येथील श्रीपतराव चौगुले महाविद्यालय ज्ञानगंगा संकुलातील विविध विभागांमार्फत योग दिनानिमित्त आयोजित केलेल्या योगा प्रात्यक्षिके प्रारंभप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ. श्रीमती व्ही. पी. पाटील होत्या. जयश्री गायकवाड या विद्यार्थिनीने योगा व प्राणायामची प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी डॉ. उषा पवार, एम. एस. सावंत, मानसिंग पाटील आदी उपस्थित होते.

VITTHALRAO PATIL MAHAVIDYALAY, KALE
VPM
Arts, Commerce & Science

## श्री दत्त शिक्षण प्रसारक मंडळ, कळे

**पुनाळ :** कळे (ता. पन्हाळा) येथील श्री दत्त शिक्षण प्रसारक मंडळ पणुत्रे संचालित आमदार शंकर धोंडी पाटील प्राथमिक विद्यालय, विठ्ठल पाटील माध्यमिक विद्यालय ,जुनिअर कॉलेज, विठ्ठलराव पाटील महाविद्यालय कळे विभागांतर्फे योग दिन झाला. उद्घाटन प्राचार्या डॉ. प्रमिलाताई भोसले, मुख्याध्यापक नामदेव नांदवडेकर, प्राचार्य डॉ. कमलाकर राक्षसे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी संस्थापक विठ्ठलराव पाटील होते. प्रशिक्षक म्हणून प्रा. विक्रम यमगेकर, पतंजलीचे प्रसारक भरत मोळे, सहाय्यक शिक्षक विलास पाटील, संभाजी बोंद्रे यांनी काम पाहिले. विठ्ठलराव पाटील म्हणाले, 'निरोगी शरीर योगाद्वारेच होते.' नियोजन संजय चौगले व वैशाली संघर्षी यांनी केले. सूत्रसंचालन रमेश दराडे, प्रज्ञा निकम यांनी आभार मानले.

सकाळ TODAY

कोल्हापूर, शुक्रवार, २३ जून २०२३

**Prof. Vikram Yamagekar**
Director of Physical Education
Vitthalrao Patil Mahavidyalay
(Arts. Commerce & Science)
Kale, Tal. Panhala, Dist. Kolhapur

**I/C PRINCIPAL**
Vitthalrao Patil Mahavidyalaya, (Arts, Commerce & Science) K
Tal. Panhala, Dist. Kolhapur

Scanned by CamScanner